Vol 6 Issue 5 Nov 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 5 | November - 2016

GRT Golden Research Thoughts

# भारतीय संगीत आणि सौंदर्यशास्त्र

डॉ. सौ. अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

### सारांश
भारतीय संगीत, साहित्य, नृत्य, नाट्य, शिल्प इ. सर्व कलांना एकत्र आणणारा सौंदर्यशास्त्र हा एक धागा आहे. मूलत: रसिकतेचे बीज कुठल्या एका कलेत नसून त्या कलेच्या मुळाशी असलेल्या दृक श्राव्य संवेदनेत त्या बाबतच्या उपजत, उत्कट संवेदनशीलतेत आहे. कलेच्या क्षेत्रात कलाकृतींनी मोहरुन जाणे हा आनंदाचा ठेवा आहे. सौंदर्यनिर्मिती करता येणे यापरती मानवाला दुसरी श्रेष्ठ देणगी नाही. सत्य आणि सौंदर्य यांच्यात कोटी-भिन्नता आहे. त्यामध्ये सौंदर्याची श्रेष्ठता आहे. मानवी अनुभवाच्या मुळाशी इंद्रिय संवेदना असतात, म्हणून मानवी मनाची धडपड सतत संवेदनांची संगति लावण्याकडे असते. अनुभवांची ओढ एकतर सत्याकडे असते किंवा सौंदर्याकडे असते. सत्य आणि सौंदर्य हीच अंतिम मूल्ये आहेत.
प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय संगीत आणि सौंदर्यशास्त्र याचा वेध घेतला गेला आहे.

*बीज शब्द :*सौंदर्यशास्त्र, सौंदर्यानुभूती, अभिरौची शास्त्र, रस-भाव सिद्धांन्त.

### प्रस्तावना :
प्राणिमात्रांमध्ये अभिनय, मुद्रा आणि नादाधारे भाव प्रकट करण्याची जिज्ञासा स्वभावत:च असते. अभिनयाने नाट्यास जन्म दिला, तर नादातून भाषा आणि संगीताची निर्मिती झाली. नाद आणि अभिनयाशी संबंधित जेवढ्या कला आहेत त्या समस्त मानवी मनांना आनंद देतात. एव्हढेच नव्हे तर व्यक्तिगत राग, द्वेषापासून ब्रम्हानंदा सारखा अलौकिक आनंद देतात, मनुष्यास मोक्ष प्राप्ति करून देतात. 'शब्द', 'स्वर' आणि 'अभिनय' या सर्वांची एकत्रित शक्ती 'रसाची अलौकिक निर्मिती करण्यास सहायक ठरतात.
संगीत कलेमध्ये गीत, वाद्य आणि नृत्य शब्द, स्वर आणि अभिनय हे येतात. मानवी हृदयात स्थायी भाव सदैव असतात. त्या भावांच्या उद्दीपनातून रस निष्पत्ती होते आणि त्या रसातून कला जन्य सौंदर्याची अभिव्यक्ती होते. यालाच इंग्रजीत 'ऐथेस्टिक व्हॅल्यू ऑफ आर्ट' म्हणतात.
भारतीय संगीतातील सौंदर्यशाखेबद्दल, विपूल प्रमाणात विचार झालेला आहे. 'संगीत', 'साहित्य', 'नृत्य', 'नाट्य', शिल्प इ. सर्व कलांना एकत्रित आणणारा सौंदर्य शास्त्र एक समान धागा आहे.

### सौंदर्यबोध करुन देणारी इंद्रिये :
'नेत्र' आणि 'कर्ण' ही दोन्ही ज्ञानेंद्रिये आहेत. सौंदर्यबोध करून देतात. भारतीयांच्या मते रंग, श्रवण, रुप, गंध, स्पर्श यां पाच क्रियांतून सौंदर्य बोधाचे आकलन होते म्हणून त्यांना बोधेंद्रिय मानतात. त्यांच्या मुळेच सौंदर्य ग्रहण करता येते. रुप, रंग, गंध, श्रवण, स्पर्श यांच्या माध्यमातून ज्या प्रमाणात रसोत्पादन कमी, जास्त असेल त्या मानाने ती वस्तू कमी अधिक प्रमाणात सुंदर समजली जाते.

### सौंदर्याचा अर्थ :
'अभिरुचीला मान्य असणारा', 'अभिरुचिपूर्ण' किंवा 'अभिरौचिक' असा सांगता येईल.'२ एकाच एका अभिरुचीला 'सौंदर्य' आणि 'कुरुपता' यांचा प्रत्यय येत असतो, तीच ती सुंदर/कुरुप असा मूल्यनिर्णय करीत असते म्हणून संगीतातील कलात्मकतेचे आणि अकलात्मकतेचे शास्त्र म्हणजे संगीताची अभिरौचिकी. (ईस्थेटिक्स ऑफ म्युझिक)

### भारतीय विचारवंतांच्या मते -
सौंदर्याचे भारतीय विचारवंतांनी दोन भाग मानलेले आहेत (१) प्राकृत (२) अप्राकृत

सौंदर्य
↓
प्राकृत → बुद्धि, मन, भावनाद्वारे ग्राह्य सौंदर्य → सृष्टीचे सौंदर्य

अप्राकृत → अध्यात्मवादी, ऋषिमुनींद्वारे अंतरज्ञानाने लागलेला शोध → सृष्टी सौंदर्याचा आभास → मन, बुध्दी मध्ये अगोचर असल्याने अवर्णनीय आहे.



***अप्राकृत सौंदर्य :***

अप्राकृत सृष्टी सौंदर्य मन व बुद्धी मध्ये अगोचर आहे. अवर्णनीय, आतुलनीय आहे, त्याला मोजमाप नाही. भाषा नाही. ते 'अनिर्वचनीय सौंदर्य सुख', सौंदर्याच्या विधात्मक भक्तियोगात 'अध्यात्म' या साधनांनी ओळखले जाते. उपनिषदात त्याला 'विज्ञान' असे संबोधले आहे.यालाच अध्यात्मवादी, 'विज्ञान चक्षू' किंवा 'भक्तिनेत्र' म्हणतात. संत गुलाबराव महाराजांना अंध असून देखील 'प्रज्ञाचक्षू' याच कारणाने संबोधले आहे.

सौंदर्यशास्त्र आणि संगीत या विषयी मर्ढेकर म्हणतात –

(अ) 'All arts aspire in the stage of Music'


असे बी. सी. मर्ढेकरांनी सौंदर्याची परिभाषा करतांना म्हटले आहे. ३

(ब) सौंदर्य हा एक मूलभूत संबोध आहे. त्याचे स्पष्टीकरण त्याच्या सारख्याच दुसऱ्या मूलभूत संबोधाच्या सहाय्याने करता येते. सौंदर्याइतकाच दुसरा मूलभूत संबोध म्हणजे 'सत्य' असे देखील मर्ढेकर म्हणतात. ४ मर्ढेकरांच्या मते सौंदर्य शास्त्र हे वर्णनपर शास्त्र नसून आदर्शी (नॉरमेटीव्ह) शास्त्र आहे.

(क) संगीत कला ही सर्व श्रेष्ठ कला आहे आणि वाङमय कला ही सर्वात कनिष्ठ असल्याचे सांगितले आहे. इतर ललित कला या दोहोंमध्ये कुठेतरी बसतात.५ चित्र, शिल्प, नृत्य, वास्तू या कलांच्या पायऱ्या कोणते ते मात्र त्यांनी सांगितले नाही. एकाच संवदनेवर आधारलेली कला ही मध्यमदृष्ट्या नितळ व म्हणून श्रेष्ठ कला होय.

गंध-स्पर्श-रस संवेदनानुभव जीवनोपयोगी असतात. श्रुती आणि दृक संवेदनाच्या तुलनेने गंध, स्पर्श, रस या लवकर शिणणाऱ्या संवेदना आहेत श्रुतिप्रत्यय आणि दृक प्रत्यय दीर्घकाळ न शिणता घेऊ शकतो.

***मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा :***




***संगीत आणि सौंदर्य :***

संगीताच्या सौंदर्यशास्त्रात संगीतसंबद्ध संकल्पनांचे अर्थ, त्यांचा पारस्पारिक संबंध, सौंदर्याच्या दृष्टीने त्यांची एक व्यवस्था या गोष्टी आणि यासंबंधी काही गोष्टींचा समावेश होतो. संगीताचे सौंदर्य राग, ताल अर्थात गीतांच्या लयीवर अवलंबून असते. स्वरांचे का कू हे देखील महत्त्वपूर्ण अंग होय. कोणत्याही एका स्वर समुदायाने अथवा शब्दाच्या स्वर व रसमय परिपाकाने संगीतकार श्रोत्यांच्या मनात रसनिष्पत्ती करण्यात यशस्वी होतो.

संगीताचे सौंदर्य, नाद आणि लयीच्या सूक्ष्म तत्त्वाधारित आहे. नाद आणि लयीचे तत्त्व संगीताचे 'प्राण' आहेत. ऋषि, महर्षिंनी नाद सौंदर्यातून उत्पन्न रस-तत्वाचा विचार करुन आनंद देणाऱ्या नियमांना स्थापित केले आहे.

लय तत्त्वातून सौंदर्याचा प्रत्यय येतो व 'जिथे जिथे लय तिथे तिथे सौंदर्य' अशी मर्ढेकरांची भूमिका आहे. सृष्टि सौंदर्य, संवेदना निष्ठ, ललित कलांमधील सौंदर्य व वाङ्मय कलेतील सौंदर्य या सर्व सौंदर्याचा आधार लयतत्त्व हाच आहे.

लयतत्त्व गति सापेक्ष असल्याने गति असेल तेथेच लयतत्त्वाचा अविष्कार होऊ शकतो. जेथे प्रत्यक्ष गती नाही तेथे लय असू शकत नाही. 'लय' हा मूलत: गायनकलेतील शब्द आहे. मात्र तो चक्षुग्राह्य अशा इतर कलाकृतींच्या संदर्भात देखील वापरला जातो. संगीतामध्ये तो गत्यर्थक व कलार्थक असा आहे. गतीचे तीन प्रकार आहेत. द्रुत, मध्यम आणि विलंबित. इतर कलांच्या बाबतीत त्याचा अर्थ Harmonius corelations of parts असा होतो. कारण घनरुप द्रव्य किंवा रेषा-रंग यांचे आधार स्थिर असतात. या चक्षुग्राह्य गोष्टींना गती द्रुत किंवा विलंबित कशी असू शकेल? नृत्य आणि संगीतातच ते शक्य आहे. संगीत कलेमध्ये व नृत्यकलेमध्ये गत्यर्थक लय असते. संगीतकलेमध्ये स्वरप्रवाहातून गतीचा प्रत्यय येतो तर नृत्यकलेमधून अवयवांच्या हालचालीतून गती जाणवते.


***लयतत्त्व :***

गतीची संकल्पना कालसंकल्पनेवर आधारित संकल्पना आहे. कालसापेक्षगती अवकाश (स्पेस) या दुसऱ्या मूलभूत संकल्पनेतून अविष्कृत होत असते. संगीतात

श्रुतिसंवेदनेतील दोन घटकांतून, चित्र-शिल्प इ. कलांमधे दोन रंगादि घटकांतून, साहित्यात भावार्थातील घटकांतून ते अविष्कृत होत असते.

थोडक्यात - प्रत्येक कलाकृती आपल्या माध्यमातील घटकांमध्ये अवकाश निर्माणक रते व त्या अवकाश कालविभक्त घटकांना कालतत्वाने जोडत जाते. हे कालतत्व ही कला कृतीतील खरी गती व तेच लयतत्त्व असते.

संवाद संबंध, विरोध संबंध व समतोल संबंध यांच्यात जेव्हढी नवीनता (जीळसळपरश्र्ळीूं) असेल तेवढी त्या कलाकृतीतील सौंदर्य संपन्नता वृद्धिंगत होईल.





*'लय' व 'ताल' या दोन संज्ञांमधील फरक :*

'लय म्हणजे मोजण्याचे लहानात लहान युनिट अथवा एकक म्हणजे मात्रा व मात्रांचे कमी-अधिक संख्यांचे गट म्हणजे ताल होत. लय ही सर्वात्रिक असते. कोठल्याही देशातील संगीतात आढळते, पण ताल ही खास भारतीय संकल्पना आहे. भारतीय कलावंतांच्या बुध्दीची एक मोठी झेप म्हणजे ताल होय म्हणून ताल हे भारतीय संगीताचे वैशिष्ट्ये आहे. तालामध्ये आवर्तन आहे. चक्राकार गती आहे म्हणजे ताल हा चक्राप्रमाणे गोल फिरुन पुढे जात असतो तर लय ही रेषेप्रमाणे अखंड पुढे धावत असते, ती उलट मागे येत नाही.६

संगीतातील सौंदर्य, नाद आणि लयींच्या सूक्ष्मतत्वावर अवलंबून असते. ही तत्वे संगीतामध्ये प्राणप्रतिष्ठा करतात. श्रुतिपासून स्वर, स्वरापासून राग, रागाला रसामधील परिणित करुन उत्साह, विनोद, मादकता, करुणा, चिंता व उत्सुकता इ. च्या माध्यमातून मनुष्य मात्राला तन्मय करतात.

विद्वान पंडितांनी नाद सौंदर्यामधील उत्पन्न रस तत्वांचा विचार करुन आनंद प्रदान करणाऱ्या तत्त्वाची निर्मिती केली. ते नियम आपणास नियमबध्द करु शकत नाहीत, परंतु लोकरुचि, लोक स्थितीनुसार देशकाल परत्वे परिवर्तन, परिवर्धन करण्याचा अधिकार देखील प्रदान करतात. प्राणिमात्राच्या हृदयातील स्थायी भाव जेव्हा दैनंदिन अथवा लौकिक व्यवहारातील भाव, राग, व्देष, मत्सर इ. क्रियांमुळे जागृत होऊन त्यामध्ये विकृती येते. त्याऐवजी संगीत व इतर महत्त्वपूर्ण कलांच्या माध्यमातून भाव जागृती होते तेंव्हा ते सद्प्रवृत्तीचे भाव सौंदर्य चेतनेने प्रगट होतात. म्हणुनच राग, व्देष, मत्सर इ. विकृतीचे भाषण मानवाला ऱ्हासाकडे अवनती कडे घेऊन जातात तर संगीतादि कल्प जन्य भाव मानवाला चेतना अथवा उत्कर्षाकडे घेऊन जातात.




महर्षि भरताच्या मतानुसार मानवाच्या मनातील भाव, विभाव व अनुभाव यांच्या संयोगाने रस निष्पत्ति होते. जर कल्पनाभूति असेल तर अविकारी रुपात घेऊन चेतनेला शुद्ध किंवा सात्त्विक आनंद प्रदान करुन उच्चभ्रू बनवितात. संगीतातील आचार्यांनी व्यंजना शक्ति मानलेली आहे. आनंदवर्धन आचार्यांनी असे म्हटले आहे की गीताचे शब्द अवाचक असून देखील रस व्यंजक असतात. ज्या प्रमाणे गेयस्वरांचे देखील विशिष्ट रुप असते. स्थायी स्वरांपेक्षा स्वर विशेष याचे अंतर त्याचे स्वरुप स्पष्ट करते.

ज्याप्रमाणे वाक्य समाप्त झाल्यावर त्याच्या अर्थाचा बोध होतो. त्याचप्रमाणे गेय स्वर संदर्भाने अंगभूत स्वर आपल्या स्वरुपानंतर रसभाव बोध करतात. गीतातील स्वरांचे स्वरुप व्यंजनेचे माध्यम आहे. नवनविन शब्दांद्वारा अभिनयाची व्यंजकता सिद्ध होते.

संगीताचे सौंदर्य अशा रसामध्ये समाविष्ट आहे की, ते रजोगुण, तमोगुण समाप्त झाल्यानंतर अंत:करणातील सत्व गुणाला वृद्धिंगत करुन विशेष चैतन्य स्वरुप परिचायक ठरतात. त्यावेळी मानव काम, क्रोध, शोक, लोभ अथवा चिंता इ. पासून मुक्त होऊन ब्रह्मानंद सहोदर सांगीतिक आनंदामध्ये अवगाहन करु लागतो.

नादसौंदर्य समस्त प्राणीमात्रांना प्रभावित करण्यासोबत जड प्रकृतीला देखील प्रभावित करते. म्हणूनच नादोमयं जगत सर्वम् संबोधले गेले आहे. स्वरोत्पत्ति होताच तत् संबंधित भाव उत्पन्न होतात. ते भाव स्वर बिंदु व नाद कंपनाच्या विस्ताराने उत्कट आणि गहन होऊन पंच महाभूतामध्ये संचार करीत हृदय आणि मस्तक कोषाला नियंत्रित

करतात. त्यामुळे जड आणि चेतन यांच्यामध्ये एक व्यवस्था स्थापित होते. काल साक्षात रुप ग्रहण करु लागतो आणि त्या रुपात मन:स्थिती पूर्व संस्कार व स्थायी रुप भावाच्या उद्दीपनामधून योग्य प्रतिबिंब दिसू लागते व बिंब रुप रसोद्रेकाच्या माध्यमातून हृदयाला काल्पनिक सुख व दु:ख प्रदान करतात. या अवस्थेमध्ये ठोस पदार्थ संचरणशील मुक्त व पारदर्शी बनतात. स्वराची दीर्घता, विस्वरता, सुरेलपणा, वादी-अनुवादी प्रतिरोधी आणि द्वंद्वात्मक स्थिती व तत्संबंधीत कारण नाद सौंदर्याच्या चरमावस्थेपर्यंत पोहोचतात म्हणून संगीत ऐकतांना मध्ये-मध्ये अविस्मरणीय आनंदातिरेकाची स्थिती उत्पन्न होते. काल, उर्जा, पदार्थ यांच्यामध्ये एका सामंज स्वरुप समरुपाचे स्थापत्य होते. चेतनेचे आवरण नष्ट होऊन त्याची चेतनता व स्वरांवेद्य आनंदाचा अनुभव होऊ लागतो तसेच बहिर्मुखी वृत्ती अंतर्मुखी होऊन सौंदर्यरुपात लीन होऊ लागते.

ध्वनिमधुन उत्पन्न व्यंजन शब्दाला जन्म देतो, शब्द अर्थाला जन्म देतो तर अर्थामधून स्पंदन उत्पन्न होते. स्पंदनातून पुन्हा स्वर उत्पन्न होतो. तर स्वरापासून सौंदर्याची सृष्टी होते. शब्द आणि त्यातून उत्पन्न होणारा अर्थ बराच मागे राहतो. जो पर्यंत शब्दाची सत्ता असते तो पर्यंत भौतिक आनंद व जो पर्यंत भौतिक आनंद आणि जो पर्यंत स्वरांच्या सत्तेस प्रारंभ होतो, तो पर्यंत अध्यात्मिक अनुभूती होते. हा अध्यात्मिक आनंदच, विशिष्ट आनंद किंवा सौंदर्यतत्व होय.

*तळटीपा :*

१.गर्ग, बाळकृष्ण, संगीत में सौंदर्यबोध, निबंध संगीत, संगीत कार्यालय, हाथरस, पृ. २२२
२.गोखले, विवेक (२००९), मैफिलीत जिज्ञासेच्या, पृ.५
३.संगीत सूरसागर (डिसें / जाने २०१५) पृ. ५
४.कुलकर्णी द. भि. (२००९) मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र - पुन: स्थापना, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे. पृ.२१
५.तत्रैव पृ. २६१
६.ठकार सुलभा, 'लय आणि ताल', संगीत कलाविहार - जुलै १९८२, पृ. २१४.

*संदर्भ ग्रंथ :*

१)कंगले, र.प. (१९७४), दशरुपक विधान, साहित्य-संस्कृती मंडळ मुंबई - १९७४
२)पाटणकर, रा.भा. (१९७७), ईस्थेटिक्स सोसायटी - मौज प्रकाशन गृह मुंबई.
३)कुलकर्णी, द.भि. (२००९) मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुन: स्थापना, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे - ३५
४)संगीत सूरसागर, (डिसें/जाने - २०१५)
५)संगीत कलाविहार, जुलै १९८२.
६)मर्ढेकर, बा.सी. (१९६०) सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन गृह मुंबई.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org